सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ रविवार दि.२७ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## 'महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये भाजपचे सरकार येणार', गृहमंत्री अमित शाहांचा दावा

### २०२६ मध्ये पश्चिम बंगालला ममता बॅनर्जींच्या दहशतीतून मुक्ती मिळेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ कोलकाता**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी(२७ ऑक्टोबर २०२४) पश्चिम बंगालमध्ये आयोजित पक्षाच्या सदस्यत्व नोंदणी कार्यक्रमात बोलताना बांग्लादेशातून होणाऱ्या बेकायदेशीर घुसखोरीवर तीव्र प्रतिक्रिया दिली. ही घुसखोरी थांबवली तरच पश्चिम बंगालमध्ये शांतता शक्य असल्याचे ठामपणे सांगितले. याशिवाय, त्यांनी महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन होण्याचा दावा केला.

शाह म्हणाले, २०२६ साली भाजप प्रचंड बहुमताने पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार स्थापन होईल आणि बंगालला सोनार बांगला बनवले जाईल. बंगालला कम्युनिस्ट आणि ममता यांच्या दहशतीतून मुक्त करावे लागेल, त्यासाठी भाजपचे सरकार स्थापन करणे गरजेचे आहे. यासोबतच महाराष्ट्र आणि झारखंडमध्येही भाजपचे सरकार स्थापन होणार असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला.



**बंगालमध्ये माता-भगिनी सुरक्षित नाहीत**

शाह पुढे म्हणतात, संदेशखळी, आरजी कारच्या घटनांनी हे सिद्ध होते की बंगालमध्ये आमच्या माता, बहिणी सुरक्षित नाहीत. राज्य पुरस्कृत घुसखोरी, बंगालमधील भ्रष्टाचार रोखण्याचा एकमेव मार्ग म्हणजे २०२६ मध्ये भाजपला सरकार स्थापन करण्यासाठी निवडून देणे. राज्य समर्थित घुसखोरी थांबवायची असेल तर २०२६ मध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन करावे लागेल. बंगालमध्ये रवींद्र संगीताऐवजी बॉम्बस्फोट ऐकू येतात, त्यामुळे हे थांबवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे बंगालमध्ये भाजपचे सरकार बनवणे. जे राजकारण ममता दीदींनी सुरू केले, ते २०२६ मध्ये संपणार आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

**घुसखोरी थांबवायची असेल तर...**

पश्चिम बंगालमध्ये तेव्हाच शांतता येऊ शकते, जेव्हा बांग्लादेशातून होणारी बेकायदेशीर घुसखोरी पूर्णपणे थांबवली जाईल. यासाठी राज्यात भाजपचे सरकार येणे गरजेचे आहे. भ्रष्टाचार आणि ढासळलेली कायदा आणि सुव्यवस्था यामुळे राज्यातील शांतता आणि विकासाला खीळ बसली आहे. मी बंगालच्या जनतेला २०२६ मध्ये राजकीय बदल घडवून आणण्याची आणि भाजपला सत्तेत आणून राज्यात शांतता आणि सुरक्षिततेचा पाया घालण्याची विनंती करतो, असेही शाह यावेळी म्हणाले.

**एक कोटी भाजप सदस्य बनवण्याचे आवाहन**

सर्व राजकीय पक्ष जातीच्या आधारावर चालतात, मात्र भाजप हा एकमेव पक्ष आहे, ज्याचा सामान्य कार्यकर्ताही पंतप्रधान होऊ शकतो. लोक जेव्हा भाजपचे सदस्य होतात, तेव्हा ते या देशाला महान बनवण्याच्या आणि देशाचे रक्षण करण्याच्या संकल्पाने स्वतःला समर्पित करतात. करोडो लोकांच्या कल्याणाशी ते स्वतःला जोडून घेतात. भारत मातेला जागतिक नेता बनवण्याची शपथ घ्या. मी बंगालच्या लोकांना आणि तरुणांना भारतीय जनता पक्षाचे सदस्य होण्याचे आवाहन करतो.

## राष्ट्रवादी शरद पवार गटाची तिसरी यादी जाहीर

### धनंजय मुंडे विरोधात 'या' नेत्याला संधी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत नऊ उमेदवारांची नावे आहेत. तर, पहिल्या दोन यादीत राष्ट्रवादीने ६७ उमेदवारांची घोषणा केली होती. या तिसऱ्या यादीतून बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघात धनंजय मुंडेविरोधात उमेदवार जाहीर करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस(शरदचंद्र पवार) पक्षाची तिसरी यादी

परळी – राजेसाहेब देशमुख

अणुशक्तीनगर – फहाद अहमद

चिंचवड – राहुल कलाटे

माजलगाव – मोहन बाजीराव जगताप

करंजा – ज्ञायक पटणी

हिंगणघाट – अतुल वांदिले

हिंगणा – रमेश बंग

भोसरी – अजित गव्हाणे

मोहोळ – सिद्धी रमेश कदम

## ठाकरे गटाच्या पहिल्या यादीतील १७ उमेदवार आमचे नेते, देवेंद्र फडणवीस यांचा सूचक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्षातील महाविकास आघाडीने आपल्या बहुतांश उमेदवारांची घोषणा केली आहे. मागच्या निवडणुकीच्या तुलनेत राज्यातील समिकरणं बदललेली असल्याने सर्वच पक्षांमध्ये नाराजी आणि बंडखोरीला उत आला आहे. त्यामुळे पक्षांतरही मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि राज्यातील भाजपाचे प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे गटातील उमेदवारांबाबत एक सूचक विधान केलं आहे. ठाकरे गटाच्या पहिल्या यादीमधील १७ उमेदवार हे आमचे नेते आहेत, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.



एनडीटीव्हीने आयोजित कार्यक्रमामध्ये मुलाखतीदरम्यान देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जेव्हा आपण तडजोड करतो, तेव्हा काही लोकांवर अन्याय होतो. त्याचं दुःखही होतं. कारण पहिली अडीच वर्ष आम्ही २८८ जागांवर लढण्याची तयारी करत होतो. अनेक नेते आम्ही तयार केले. परवा मी पाहत होतो की, उद्धव ठाकरे यांनी जी पहिली यादी प्रसिद्ध केली. त्यामध्ये १७ नेते हे आमचे आहेत. ते आमच्या पक्षातील नेते होते. आता आजच्या काळात राजकारणामध्ये कुणी थांबायला तयार नाही, त्यामुळे त्यातले काही जण सांगतात की साहेब, आता आम्ही एवढी तयारी केली आहे आणि तुम्ही उमेदवारी मित्रपक्षाला दिली. आम्ही निष्ठावंतच आहोत. मात्र आता आम्ही संधी मिळेल तिथून लढतो, अशी माहिती त्यांनी दिली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राजकारणामध्ये आपल्याला व्यावहारिक असावं लागतं. तसेच जमिनीवरील परिस्थिती काय आहे, हे समजूनच निर्णय घ्यावे लागतात. आज तीन पक्ष मिळूनच आम्हाला विजय मिळणार आहे, अशी जमिनीवरील परिस्थिती आहे. एकट्या भाजपाच्या भरोशावर विजय मिळू शकणार नाही. तीनही पक्षांची बेरीज करून आम्ही विजयापर्यंत पोहोचतो आहोत. भाजपा हा महायुतीमधील सर्वात मोठा पक्ष आहे, सर्वाधिक मतं भाजपाकडे आहेत हे खरं आहे. अशा परिस्थितीत तुम्हाला ते पक्ष हवे आहेत, त्यांची मतं हवी आहेत. मात्र त्यांना आम्ही जागा देणार नाही, असं म्हणता येत नाही. तडजोड करावीच लागले, असंही त्यांनी सांगितलं.

बाकी तुम्ही मगाशी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्राची निवडणूक अशी आहे की, येथे सहा प्रमुख पक्ष आहेत. म्हणजे एवढे पक्ष आहेत की प्रत्येक कलाकाराला काही भूमिका आहे. इतके सिनेमे बनत आहेत की, प्रत्येकजण जो स्वतःला हिरो समजतो. तो ज्या सिनेमात काम मिळेल तिकडे चाललाय. पण, काही लोकांच्या पक्ष सोडून जाण्याबाबत मला दुःखही आहे. मी त्यांची नावं घेणार नाही. पण युतीच्या राजकारणातील अपरिहार्यतेमुळे काही चांगली मंडळी आमच्यापासून दूर गेली, अशी खंतही देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

## महाराष्ट्रातील ७ स्थानकातील गर्दी टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने उचलले मोठे पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

मुंबईतील वांद्रे टर्मिनसवर रविवारी सकाळी चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली. एक्स्प्रेस गाडी आल्यानंतर गाडीत बसण्यासाठी प्रवाशी धावले आणि दुर्घटना घडली. यात १० प्रवाशी जखमी झाले. या घटनेनंतर आता रेल्वे प्रशासनाने महाराष्ट्रातील सात रेल्वे स्थानकावर गर्दी टाळण्यासाठी प्लॅटफॉर्म विक्री तात्पुरती थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.




वांद्रे टर्मिनसमध्ये वांद्रे-गोरखपूर एक्स्प्रेस गाडी प्लॅटफॉर्मवर आल्यानंतर जनरल डब्ब्यात जागा पकडण्यासाठी प्रवाशांनी एकदम गर्दी केली. त्यात अनेकजण जखमी झाले. जखमींना भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**प्लॅटफॉर्म तिकीट विक्री बंद**

वांद्रे टर्मिनसमधील घटना टाळण्यासाठी आणि रेल्वे स्थानकातील गर्दी कमी ठेवण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने प्लॅटफॉर्म तिकीट विक्री तात्पुरती बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई आणि महाराष्ट्रातील सात स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विकले जाणार नाही. मध्य रेल्वे प्रशासनाच्या निर्णयानुसार मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर स्थानक, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे स्थानक, कल्याण स्थानक, पुणे स्थानक आणि नागपूर स्थानकातील प्लॅटफॉर्म विक्री तात्काळ थांबवण्यात आली आहे. दिवाळी आणि छट पूजेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, ८ नोव्हेंबरपर्यंत लागू असणार आहे. ज्येष्ठ नागरिक आणि वैद्यकीय मदत लागणाऱ्यांना यातून वगळण्यात आले आहे.

## इंडिया आघाडीमध्ये फूट? विधानसभा निवडणुकीत अखिलेश यादव उमेदवार उभे करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई**

विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून जागावाटपाचा तिढा अजूनही सुटलेला नाही, यामुळे आता इंडिया आघाडीत तेढ निर्माण झाल्याचे दिसत आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत २९ ऑक्टोबर रोजी संपत आहे, पण महाविकास आघाडी घटक – काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्यातील जागावाटपावरून मतभेद



अद्याप मिटलेले नाहीत. दरम्यान, अखिलेश यादव यांची सपाही वेगळ्या वाटेवर जाताना दिसत आहे.

दरम्यान, ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत म्हणाले की, विरोधी पक्षाला 'सबका साथ, सबका विकास'ची सर्वाधिक गरज आहे. शेतकरी आणि कामगार पक्ष आणि सपा सारख्या छोट्या पक्षांनी एकतर्फी उमेदवार जाहीर केल्याबद्दलही राऊत यांनी नाराजी व्यक्त केली.दुसरीकडे, सपा महाराष्ट्राचे अध्यक्ष अबू आझमी यांनी शुक्रवारी सांगितले की, माविआ'मध्ये जागावाटपावर एकमत झाले नाही तर सपा २०-२५ जागांवर उमेदवार उभे करेल.

संजय राऊत म्हणाले, हरयाणात काँग्रेसने सर्व जागांवर निवडणूक लढवली, पण सरकार बनवता आले नाही. त्यामुळे त्यांना सर्वांना सोबत घ्यावे लागेल.

'सबका साथ, सबका विकास' कोणाला हवा असेल तर तो माविआ आहे. देशाच्या विकासाप्रती त्यांच्या सरकारची बांधिलकी व्यक्त करण्यासाठी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेकदा 'सबका साथ, सबका विकास'वर भर देतात हे विशेष, असंही ते म्हणाले.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शनिवारी उद्धव ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. ते म्हणाले, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मला जागावाटपावर बोलण्यास सांगितले आहे. मुंबईतील काही जागांसाठी चर्चा सुरू आहे.

## समाजवादीच्या पाचपैकी तीन जागांवर मविआने उभे केले उमेदवार; अडचणीत सापडले अबू आझमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी हळूहळू वाढत आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीच्या सर्वच पक्षांमध्ये जागा आणि उमेदवारांबाबत चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. महाविकास आघाडीमध्ये असलेल्या शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस आणि शरद पवार गटाने आपल्या उमेदवारांची घोषणा केली आहे. महाविकास आघाडीसोबत असलेल्या समाजवादी पक्षाची मोठी अडचण निर्माण झाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि काँग्रेसने महाराष्ट्रात समाजवादी पक्षाला सपशेल बाजूला केलं आहे.

जागावाटपाच्या बाबतीत, समाजवादी पक्षाने पाच जागांची मागणी केली होती. मात्र समाजवादीने दावा केलेल्या तीन जागांवर ठाकरे गट आणि काँग्रेसने उमेदवारांची घोषणा करुन टाकली आहे. तीन जागांवर शिवसेना आणि काँग्रेसने आपले उमेदवार उभे केले आहेत. त्यामुळे आता समाजवादी पक्ष काय भूमिका घेणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागलं आहे.समाजवादी पक्षाच्या अबू आझमी यांनी महाविकास आघाडीकडे महाराष्ट्रात पाच जागा देण्याची मागणी केली होती. मात्र अबू आझमी यांनी मागितलेल्या



पाचपैकी तीन जागांवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि काँग्रेसने २६ ऑक्टोबर रोजी त्यांचे उमेदवार जाहीर केले. अबू आझमी यांनी धुळे शहर, भिवंडी पूर्व, मानखुर्द, भिवंडी पश्चिम आणि मालेगाव मध्य जागा मागितल्या होत्या.

रईस शेख हे भिवंडी पूर्वेतील सपाचे आमदार आहेत. मात्र शनिवारी शिवसेनेने धुळे शहराचे माजी आमदार अनिल गोटे यांना उमेदवारी जाहीर केली. तर काँग्रेसने मालेगाव मध्यमधून एजाज बेग आणि भिवंडी पश्चिममधून दयानंद मोतीराम चोरघे यांना उमेदवारी जाहीर केली. तर मानखुर्द शिवाजी नगर मतदारसंघातून नवाब मलिक यांनी निवडणूक लढवण्याची घोषणा केल्याने आपल्याच जागेवर अबू आझमींच्या अडचणी वाढल्या आहेत.

यावेळी समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्या अडचणीही वाढल्या आहेत. नवाब मलिक यांनी त्यांच्याविरोधात मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने अद्याप त्यांना उमेदवारी जाहीर केली नसली तरी मलिक यांनी मानखुर्द शिवाजीनगर लढण्याचा निर्धार केला आहे.

तीन जागांवर मित्रपक्षांनी समाजवादी पक्षाला बाजूला करत उमेदवारी जाहीर केल्यामुळे मोठा पेच निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीने खेळलेल्या या खेळीमुळे अबू आझमी देखील चांगलेच अडचणीत सापडले आहेत. समाजवादी पक्षाने या जागांवर आपले उमेदवार आधीच जाहीर केले होते पण ठाकरे गट आणि काँग्रेसने जागावाटपात सपाला बाजूला केले. आता अबू आझमी यांनी पाच जागा न मिळाल्यास सर्व २५ जागांवर निवडणूक लढवणार असल्याचा इशारा दिला आहे.

## संपादकीय ......

# सोन्या-चांदीची लकाकी

सध्या भारतीय बाजारपेठेत कमालीची अस्थिरता दिसत असून, त्यामुळे विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांचा निधी सातत्याने बाहेर जात आहे. म्हणजेच समभाग आणि कर्जरोखे विकून ते इथला पैसा काढून घेत आहेत. भारतात समभाग विकून चीनमध्ये गुंतवणूक केली जात असून, त्यात अनेक बड्या कंपन्यांची तिमाही कामगिरी निराशाजनक झाल्यामुळे घसरण वाढली आहे. मूल्यांकनाच्या काळजीमुळे भारतातील विदेशी गुंतवणूकदारांकडून विक्रीचा मारा केला जात आहे. या उलट देशातील अर्थसंस्था आणि म्युच्युअल फंड समभागांची खरेदी करून ही घसरण रोखण्याचा प्रयत्न करत आहेत. 'एनएसडीएल'ने दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबरमध्येच विदेशी गुंतवणूकदारांनी ७७ हजार कोटी रुपयांचे समभाग विकून टाकले. कोरोना काळातही एवढी विक्री झाली नव्हती. त्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकांनी गटांगळी घेतली आहे. जगात ठिकठिकाणी युद्ध व संघर्ष सुरू असून, त्यामुळेही आंतरराष्ट्रीय वाहतूक तसेच कमोडिटी बाजारावर वाईट परिणाम होत आहे. त्यात चीनने मंद होत चाललेल्या अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध घोषणा केल्या असल्यामुळे परकीय गुंतवणूकदार तिकडे आकर्षित झाले आहेत.

ज्या-ज्यावेळी शेअर बाजार अस्थिर होतो किंवा देशांमध्ये संघर्ष होतो, त्या-त्यावेळी सोन्या-चांदीची मागणी वाढत असते, हा इतिहास आहे. याचे कारण, जेव्हा गुंतवणूकदार भयभीत होतो, भविष्यकाळाबद्दल त्याला अनिश्चितता वाटू लागते, तेव्हा त्याला सोन्या-चांदीत पैसे ठेवणे हे अधिक सुरक्षित वाटू लागते. सध्या सोन्या-चांदीचे भाव विक्रमी पातळीवर पोहोचले असून, दिल्लीतील सराफा बाजारपेठेत सोन्याचा भाव प्रतिदहा ग्रॅम ३५० रुपयांनी वधारून ८१ हजार रुपयांवर गेला, तर चांदीच्या भावात किलोमागे १५०० रुपयांची वाढ होऊन, त्याने एक लाख रुपयांची पातळी ओलांडली. मुंबईच्या घाऊक बाजारात दहा ग्रॅम शुद्ध सोन्यासाठी ७८ हजार २५० रुपये, तर चांदीचे किलोमागे ९८ हजार ३७५ रुपयांवर व्यवहार सुरू होते. चालू वर्षात आतापर्यंत सोन्यात ३२ टक्क्यांची तेजी दिसून आली. चांदीही लक्षणीय प्रमाणात वाढली. दिवाळीआधी चांदीचा भाव १ लाख १० हजार रुपयांवर जाण्याचा अंदाज या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. सणासुदीला ग्राहकांकडून सोन्याची खरेदी होत असते. गणपती, नवरात्र, दसरा आणि दिवाळी या काळात खरेदी वाढते. देवदेवतांना मढवण्यासाठीही दागिन्यांची खरेदी केली जाते. अनेकजण थेट सोने खरेदी करून, ते देवांच्या मूर्तींच्या चरणापाशी ठेवत असतात, तर औद्योगिक मागणी वाढल्यामुळे चांदीचे भाव वाढले आहेत. इलेक्ट्रिक वाहने आणि सौर पॅनेलला उत्तम मागणी असून, त्याच्या सुट्या भागांमध्ये चांदीचा वापर केला जातो. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये इस्रायलवर 'हमास'ने हल्ला केल्यापासून सोन्या-चांदीच्या दरांत वाढ होत आहे. आता या युद्धात इराण, लेबनॉन, येमेन या देशांचाही समावेश झाला असून, युद्ध संपेपर्यंत सोने आणि चांदीचे भाव उतरणीस लागण्याची बिलकूल शक्यता नाही.

दुसरीकडे अमेरिकेने अर्थव्यवस्थेत प्राण फुंकण्यासाठी व्याजदर कपातीचे चक्र सुरू केले आहे. व्याजदर कमी झाल्यावर सोन्या-चांदीचे भाव नेहमीच वधारतात. शिवाय युरोप आणि अमेरिकेत मंदीचे सावट असल्यामुळे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याला पसंती मिळत आहे. २४ कॅरेट सोने ९९.९ टक्के शुद्ध असते आणि २२ कॅरेट सोने अंदाजे ९१ टक्के शुद्ध असते. २४ कॅरेट सोने शुद्ध असले, तरी त्याचे दागिने बनवता येत नाहीत. त्यामुळे बहुतेक दुकानदार २२ कॅरेटमध्ये सोने विकतात. २२ कॅरेट सोन्यात तांबे, चांदी, जस्त यासारख्या अन्य धातूंचे ९ टक्के इतके मिश्रण करून दागिने घडवले जातात. हॉलमार्कचा उद्देश सोन्याची पारदर्शकता तपासणे, हा असतो. दागिन्यांमध्ये किती कॅरेट सोन्याचा समावेश आहे, हे हॉलमार्कसह लिहिले जाते. या युनिक कोडद्वारे दागिने शोधणे सोपे होते. १ एप्रिल २०२३ पासून हॉलमार्कशिवाय कोणतेही दागिने बाजारात विकता येणार नाहीत, असा नियमच केंद्र सरकारने केला. मागच्या अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोन्या-चांदीवरील सीमाशुल्क ६ टक्क्यांनी कमी केले. २०२३ मध्ये भारतात २.८ लाख कोटी रुपयांची सुवर्ण आयात करण्यात आली. त्यावरील सीमाशुल्कातून केंद्राला ४२ हजार कोटी रुपये मिळाले. आता सीमाशुल्क कमी केल्यामुळे सोन्या-चांदीच्या किमती घटतील अशी अपेक्षा होती; पण एकीकडे इस्रायलचे गाझापट्टीवरील हल्ले आणि दुसरीकडे रशिया-युक्रेन धुमश्चक्रीमुळे सोन्या-चांदीची मागणी वाढतच गेली आणि म्हणूनच त्यांचे भावही वधारले. सोन्याच्या तुलनेत चांदी जास्त घेतली जाते. शिवाय सोने चांदीपेक्षा जास्त घन असते. त्यामुळे सारख्याच वजनाच्या सोन्यासाठी चांदीपेक्षा कमी जागा लागते. सोन्याचा सुमारे १२ टक्के वापर हा औद्योगिक कारणांसाठी होतो, तर चांदीबाबत हे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. फोन, टॅबलेट, सोलर पॅनेल, किचनवेअर, औषधे, कार यासह असंख्य उद्योगांमध्ये आणि तंत्रज्ञानामध्ये चांदीचा वापर केला जातो. त्यामुळे अर्थव्यवस्था तेजीत असते त्यावेळी चांदीची मागणी वाढते आणि मंदावते तेव्हा त्याचा चांदीलाही फटका बसतो. दागिन्यांसाठी व गुंतवणुकीसाठी सोन्याचा वापर केला जातो. सोने ऐतिहासिकदृष्ट्या 'काऊंटर सायक्लिकल गुंतवणूक' म्हणून ओळखले जाते. याचा अर्थ, समभाग आणि कर्जरोखे जेव्हा चांगली कामगिरी करताना दिसत नाहीत, तेव्हा गुंतवणूकदार सोन्याकडे झुकतात आणि त्याची किंमत त्यामुळे वाढते. उलट शेअर बाजार तेजीत असताना गुंतवणूकदार सोने विकून येणारे पैसे शेअर बाजारात गुंतवत असतात. देशातील उपभोग आणि गुंतवणुकीची मागणी वाढत असल्याचे निरीक्षण नुकतेच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी नोंदवले आहे. सोन्या-चांदीच्या दरवाढीपेक्षा प्रत्यक्ष अर्थव्यवस्थेची मार्गक्रमणा योग्य दिशेने व जोमदारपणे होणे, हे शेवटी अधिक महत्त्वाचे आहे. देशातील सोन्या-चांदीचे उत्पादन वाढून अधिकाधिक लोकांना रोजगार मिळणे, ही बाब जास्त आल्हाददायक असते, अर्थव्यवस्थेला पोषक असते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

# स्क्रीन आणि डोळ्यांवरील ताण

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

आजघडीला अनेकांचा दिवसातील जास्तीत जास्त वेळ स्क्रीनसमोर जातो. स्क्रिनमधून येणारा निळा प्रकाश हा डोळ्यांना अधिक नुकसान करतो. त्यामुळे डोळ्यांमध्ये दुखणे, खुपणे, डोळे लालसर होणे, डोळ्यात जळजळ होणे अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.




डोळ्यांच्या या समस्येला 'डिजिटल आय स्ट्रेन' असं म्हटलं जातं. डिजिटल आय स्ट्रेन आजकालच नाही, तर गेल्या काही वर्षांपासून गंभीर समस्या होत चालली आहे. काही अभ्यासकांच्या मते तर साधारणतः ५० टक्के लोकांमध्ये ही समस्या दिसून येते; पण या समस्येकडे दुर्लक्ष होते आहे. एकदा ही समस्या बाढीला लागली की, याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. त्यासाठी कॉम्प्युटरसमोर काम करताना स्क्रीनचा उजेड कमी ठेवावा जेणेकरून डोळ्यांबर त्याचा परिणाम होणार नाही. उजेड जास्त असेल, तर डोळे सुकणे, ताण येणे, मान दुखणे यासारख्या समस्या भेडसावतात. त्यामुळे डोळ्यांचे नुकसानच होते.

**डोळ्यांचे व्यायाम**

डोळ्यांवरील ताण कमी होण्यासाठी काही डोळ्याचे व्यायाम करावेत. डोळे बंद करून आपल्या हातांच्या तळव्यांनी ते झाकून घ्यावेत. हलक्याने हात वरून खाली आणावेत. त्यामुळे डोळ्यांना आराम मिळतो. तसेच दर काही मिनिटांनी पापण्या मिचकावण्याची सवय लावा.

यामुळे डोळ्यात योग्य तो दमटपणा राहतो आणि कोरड्या डोळ्यांची समस्या निर्माण होण्याची जोखीम कमी होते. तसेच डोळ्यांच्या पापण्या मिचकवल्याने डोळ्यांनाही आराम मिळतो. मांसपेशीवर पडणारा अतिरिक्त दबाव निघून जातो.

**डोळे फिरवणे :** डोळे चारही बाजूंना फिरवणे हा डोळ्यांसाठी उत्तम व्यायाम आहे. दहमिनिटांपर्यंत डोळे चारही बाजूला फिरवावेत. एकदा घड्याळ्याच्या दिशेने तर एकदा विरुद्ध दिशेने फिरवावेत. त्यामुळे दृष्टी वाढते.

**डोळ्यांना मसाज :** चेहऱ्याला फेशियल किंवा संपूर्ण शरीराला मसाज करतोच; पण डोळ्यांना मसाज करण्यासाठी आवश्यकता असते. डोळ्यांचा मसाज करताना डोळे बंद करून बाहुल्यांच्या वर करावा. लहान बोटाचा वापर करून हा मसाज करावा. डोळ्यांना आराम आणि पोषण मिळण्यासाठी बदाम तेलाचा वापर करून मसाज करावा.

# बीजप्रक्रिया केल्यास कीड रोगांपासून संरक्षण, उत्पादन खर्चात २५ घट, जाणून घ्या सविस्तर

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक कृषी**

बीज प्रक्रिया केल्याने बियाण्यांमध्ये सुप्तावस्थेत असलेली कीड नष्ट होण्यासह पिकांवरील रोगावर प्राथमिक टप्प्यातच नियंत्रण मिळविता येते. त्यामुळे नुकसान टाळण्यासाठी पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करून घेणे आवश्यक आहे. बियाण्यावर प्रथम रासायनिक बुरशीनाशक, कीटकनाशकाची प्रक्रिया करावी व अर्ध्या तासानंतर जैविक खत, जैविक बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी, असा सल्ला कृषी विभागाकडून दिला जात आहे.

**बीजप्रक्रिया म्हणजे काय?**

अन्नद्रव्य उपलब्धतेत वाढ करणे, पिकांवरील कीड व रोगांना प्रतिबंध करण्यासाठी जैविक खत, जैविक बुरशीनाशक किंवा रासायनिक बुरशीनाशक, कीटकनाशकांच्या बियाण्यावर करण्यात येणाऱ्या प्रक्रियेस बीजप्रक्रिया असे संबोधले जाते.

**बीजप्रक्रियेचे असे आहेत फायदे !**

खरीप हंगामातील पेरणीसाठी एकसारखे बियाणे उपलब्ध होऊन पेरणी सुलभ होते. बियाण्यांभोवती बुरशीनाशकाचे सुरक्षित कवच तयार होण्यासह बियाण्याची उगवणशक्ती वाढून उत्पादनात वाढ होते. उत्पादित मालाचा दर्जा वाढून त्यास चांगला दर मिळतो.

**बीज प्रक्रियेदरम्यान काळजी घेणे आवश्यक!**

बीजप्रक्रिया करताना हॅन्डग्लोयन किया पॉलिथिन पिशवी हाताला गुंडाळून घ्यावी. १ लिटर पाण्यात १०० ग्रॅम गूळ टाकून पाणी गरम करावे. हे पाणी थंड झाल्यानंतर त्याचा बियाण्यावर केवळ




शिडकावा करावा. कृषि विभागाच्या शिफारशीनुसार पुढील प्रक्रिया किंवा बीज प्रक्रिया करावी.

**उत्पादन खर्चात २५ टक्के घट**

रीतसर प्रक्रिया करून पेरणीसाठी घरगुती बियाण्यांचा वापर केल्याने गतवर्षीच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये वाचवले. उत्पादन खर्चात सुमारे २५ टक्के घट आली. सोयाबीनची वाढही अपाट्याने होऊन उत्पन्नात वाढ आली.

नापिकी पासून बचाव आणि दर्जेदार शेतमाल उत्पादनासाठी पेरणीपूर्व बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. बीजप्रक्रियेमुळे अंकुरण्यापासून काढणीपर्यंत पिकांचे किडी व रोगांपासून संरक्षण होते.

**– आरीफ शाह, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

# गांधी मार्ग आणि नवपिढीतील डॉ. प्रशांत विघे

गांधीवाद वाद नसून जीवन मार्ग आहे.यशस्वी जीवन जगण्याची ती कला आहे. पट्टाभी सितारामय्या गांधीवादाबद्दल आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, गांधीवाद म्हणजे एखादा सिद्धांत नव्हे किंवा मतांचा व नियमांचा समूह नव्हे तर जीवनाचा तो एक दृष्टिकोन आहे, जीवनाची ती एक शैली आहे. मनुष्याच्या जीवनातील समस्येचे निराकरण करणारी ती एक पद्धती आहे. गांधीजींच्या विचारातील सत्य,अहिंसा,अत्यंत महत्त्वाची दोन मूल्य आहेत. प्रत्येक माणूस जीवन जगताना या मूल्याचा प्रयोग आपल्या जीवनामध्ये करीत असतो काही या प्रयोगात यशस्वी होतात तर काहींना प्रयत्न करूनही बरेचदा अपयश येते.सत्य म्हणजे अंतर्मनाचा आवाज आणि अहिंसा म्हणजे हिंसारहित आचरण, व्यवहार, हावभाव असं साधा सरळ सोपा अर्थ गांधीजींनी या मूल्यांचा सांगितला आहे. गांधीजी म्हणतात मी जगाला नवीन काहीच सांगितले नाही हा निसर्ग,हे पहाड, या टेकड्या जेवढ्या जुन्याआहे, तेवढेच जुने सत्य,अहिंसे संबंधीचे विचार आहे. गांधीजींनी संपूर्ण जगाला दिलेली महत्त्वाची देणगी म्हणजे सत्याग्रह होय.सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह.दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या लढ्याला नेमके काय नाव द्यावे याविषयीच्या मंथनातून गांधींना सत्याग्रह हा शब्द सापडला. ११ सप्टेंबर १९०६ या दिवशी गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गच्या एम्पायर थिएटरमध्ये ३००० भारतीयांसमोर सत्याग्रहाची संकल्पना प्रथम मांडली. असहकार, सविनय कायदेभंग,उपोषण, बहिष्कार, हरताळ,हिजरत, धरणे, निरोधन ही विविध साधने गांधीजींनी सत्याग्रहाची सांगितली, यातील अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे उपोषण हे होय. गांधीजींच्या या सत्याग्रह संबंधी साधनांचा उपयोग भारतात सह संपूर्ण जगात केल्या जातो. सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तींकरिता गांधीजींनी विविध प्रकारची पात्रता सांगितली त्यापैकी काही महत्त्वाच्या बाबी म्हणजे सत्याग्रह करणारी व्यक्ती दुबळ्या मनाची असता कामा नये, सत्याग्रहीच्या मनात सेवावृत्ती व इतरांविषयी प्रेमभावना असावी, सत्याग्रही मध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द असावी.

गांधी तत्त्वज्ञानातील ही बाब हेरून उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत नवपिढीतील डॉ. प्रशांत विघे यांनी महाराष्ट्र राज्यात ०१ नोव्हेंबर २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन सरसकट लागू करावी यासाठी २ ऑक्टोबर २०२४ पासून महात्मा गांधीजींच्या जयंतीचे औचित्य साधून उपोषणाला सुरुवात केली. गांधीजींनी सांगितलेली सत्याग्रहाची पात्रता पूर्ण करायला धाडस लागते ते धाडस डॉ.प्रशांत विघे यांनी दाखवून ०१ नोव्हेंबर २००५ नंतर उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांचे नेतृत्व केले. त्याबद्दल त्यांचे प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. डॉ प्रशांत विघे यांच्यासोबत महाराष्ट्रातून विविध विभागातील १६ पेन्शन फायटर यांनी सरसकट जुनी पेन्शन करिता आमरण उपोषनाला सुरुवात केली. ६ ऑक्टोबर २०२४ पर्यंत हे उपोषण चालले. या आंदोलनाच्या दरम्यान एक एक उपोषणकर्त्यांची प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यांना ग्रामीण रुग्णालयामध्ये भरती करण्यात आले. उपोषणाच्या चौथ्या दिवशी पासून जलत्यागही करण्यात आला. हे सर्व कशासाठी तर गांधीजींनी सांगितलेल्या सत्याग्रहाच्या पात्रतेतील इतरांविषयीच्या सेवावृत्तीसाठी. जसा जसा उपोषणाचा एक एक दिवस पुढे पुढे जात होत, तशी तशी उपोषणकर्त्याच्या अवस्थेबद्दल, प्रकृती बद्दल मनात अस्वस्थता निर्माण होत होती. या अस्वस्थतेमुळे ६ ऑक्टोबर २०२४ रोजी मी उपोषण स्थळी भेट दिली. त्यादिवशी डॉ प्रशांत विघे यांचा छोटा मुलगा ,मुलगी आणि त्यांची पत्नी सुद्धा उपस्थित होत्या. जुनी पेन्शन या समस्यांनी ग्रस्त विविध सहकारी आपले मनोगत व्यक्त करत होते. उपोषणकर्त्याचे खालावलेले आरोग्य पाहून उपोषण मागे घ्या,जल ग्रहण करा, अशा घोषणा देत होते. त्यापैकी एकाने तर अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला. उपोषण करताना जर कमी जास्त झाले तर जुन्या पेन्शनचे रूपांतरण फॅमिली पेन्शन मध्ये होऊ नये.शेवटी समन्वय झाला आणि उपोषण थांबले. यातून निश्चितच सकारात्मक बदल घडून येईल अशी आशा आहे. गांधीवादी विचारसरणीला अनुसरून अन्यायाविरुद्ध लढण्याचे धाडस स्वतःमध्ये रुजवणारे, गांधीजींच्या सत्य, अहिंसा, सत्याग्रहाच्या मार्गाला आपल्या आचरणात आणणारे, भ्रष्टाचार मुक्त यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून पाऊल उचलणारे नव पिढीतील डॉ. प्रशांत विघे हे गांधीमार्गाने वाटचाल करीत आहे ही बाब फार मोठी आहे. गांधीवादी मार्ग अनेक काच - खडग्यांनी भरलेला असला तरी त्यात जीवनाचे समाधान आहे. गांधीवादी विचार कृतीत आणणाऱ्या डॉ. प्रशांत विघे यांना त्यांच्या भावी जीवनातील विविध प्रकारच्या सुधारणा करण्यासाठी हार्दिक शुभेच्छा देतो आणि गांधी विचारातील एका कोटेशन चा या ठिकाणी उल्लेख करून माझ्या शब्दांना विराम देतो.

First they ignore you,Then they laugh at you,Then they fight you,Then you win.

**प्रा.डॉ.प्रवीण ज.गुल्हाने**
**महिला महाविद्यालय अमरावती**
**मो. न.९३२५६३०९६६**

# महाराष्ट्रासह विदर्भात २९ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान पाऊस, वाचा सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

एकीकडे पावसाने महाराष्ट्रातून माघार घेतल्यानंतर देखील २९ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पावसाची शक्यता हवामान शास्त्रज्ञ के एस होसाळीकर यांनी व्यक्त केली आहे.

ऑक्टोंबर च्या पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसानंतर (ठरळप णविरींश) मागील तीन-चार दिवसांपासून पावसाने उघडीप दिली आहे. ऑक्टोंबरचा हा शेवटचा आठवडा असून या आठवड्यात २९ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या तीन दिवसाच्या कालावधीत महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस आणि ३० ते ४० किमी प्रति तास वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आले आहे.



यात २९ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, पुणे, रायगड, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यात येलो अलर्ट देण्यात आला आहे, त्यानुसार या जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित जिल्ह्यांसाठी कोणताही अलर्ट देण्यात आलेला नाही.

तर ३० ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अहिल्यानगर, पुणे, सातारा, रत्नागिरी, रायगड, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, सोलापूर, धाराशिव आणि विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली या भागात येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर उर्वरित जिल्ह्यात कोणताही अलर्ट नाही. तसेच ३१ ऑक्टोबर रोजी केवळ विदर्भातील यवतमाळ, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यात देण्यात आला असून इतर जिल्ह्यात कोणताही अलर्ट देण्यात आला नाही.



# गाव, शहरासाठी योजना झाल्या 'स्मार्ट' शेतकऱ्यांसाठी कधी होणार? शेतकऱ्यांच्या वाट्याला अजूनही ७० वर्षांपूर्वी होती तीच परिस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

विकासासाठी, गावाच्या विकासाठी शासनाच्या वतीने स्मार्ट योजना राबविण्यात आल्या. यावर कोट्यवधींचा खर्च करीत विकास साधण्याचा प्रयत्न करण्यता आला. मात्र शेतकऱ्यांच्या वाट्याला अजूनही ७० वर्षांपूर्वी होती तीच परिस्थिती असल्याने शेतकऱ्यांसाठी स्मार्ट योजना कधी होणार असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा संबोधले जाते. परंतु, शेतात राबणाऱ्या बळीराजाला निर्सगाच्या अवकृपेचा फटका बसतो. त्यामुळे नुकसानीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांची दयनीय अवस्था होत असते. कित्येकदा शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळत नसल्याने शेती कशी करावी, असा प्रश्न नेहमी सतावत असतो. बळीराजाकडून शासनाच्या धोरणावर खापर फोडत शासनाचे चुकीचे धोरण जवाबदार असल्याची भावना व्यक्त केली जाते. निवडणुकीच्या कालावधीत राजकीय मंडळींकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आश्वासन दिले जाते. मात्र नंतर ती आश्वासने हवेतच जातात. वर्धा जिल्ह्यात पिकासाठी बारमाही पाण्याची व्यवस्था केली नसल्याने एका पिकावरच शेतकऱ्यांना समाधान मानावे लागते. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत शेतपाणंद रस्त्याचा प्रश्न कायम आहे. एकीकडे वाढती महागाई व




बिनभरवशाचे शेतीमुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा आहे. सावकार, बँका, पतसंस्था, सहकारी सोसायटीकडून कर्ज घेतले जाते. कर्ज थकले की बँकांकडून नवीन कर्ज मिळत नाही. त्यामुळे दारिद्र्य शेतकऱ्यांची साथ सोडायला तयार होत नाही. निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असलेला शेतकरी कर्जबाजारी होऊन पीक घेत असतो. अशा अवस्थेत शासनस्तरावरून शेतकऱ्यांच्या कर्जाचे ओझे कमी करण्यासाठी विविध उपाययोजना आखल्या जात असल्या तरी जाचक अटी व शर्तीच्या पूर्ततेत शेतकऱ्यांच्या कर्जाची मेख अडकली असते. एकीकडे शेतकऱ्यांची बिकट परिस्थितीने मानसिकता ढासळत चालली असल्याने शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्याची आवश्यकता आहे. मुख्यत्वे ग्रामीण भागात शेतकरी वर्ग हा मोठ्या प्रमाणात आहे. मात्र समस्या जाणून त्यावर तोडगा काढत नाही.

**हमीभावाची गरज**

शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी उपाययोजना व शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देण्याच्या निर्णयाची गरज निर्माण झाली आहे. तरच शेतकरीवर्ग कर्जाच्या खाईतून बाहेर येईल. त्यांचे जीवन जगण्याचे मनोबल वाढेल. रखडलेले सिंचन प्रकल्प मार्गी लावून शासनस्तरावरून मुबलक बारमाही सिंचन व्यवस्था, शेतकयांना योग्य मार्गदर्शन केंद्र यासारख्या विविध बाबींवर लक्ष केंद्रित करून प्रत्येक शेतकऱ्यां- पर्यंत शासनाच्या योजना पोहचविण्याची जवाबदारी, खर्चानुसार शेतमालाला हमीभाव मिळाला तर शेतकरी सुखी व समाधानी होईल, अशी आशा शेतकऱ्यांमध्ये बाळगली जाते.

# प्रकाशाच्या (दिपावली) उत्सवात घ्या वीजसुरक्षेची काळजी : महावितरणचे ग्राहकांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

दिवाळी सण साजरा करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. सणाच्या कालावधीत विद्युत सजावट, रोषणाई तसेच फटाक्यांची आतषबाजी करताना वीजसुरक्षेची काळजी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक वीज यंत्रणेसोबतच घरगुती रोषणाईच्या विद्युत उपकरणांपासून सावध राहावे. कोणत्याही प्रकारचा धोका न पत्करता वीजसुरक्षेची काळजी घेत दिवाळी सण साजरा करावे, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.


महावितरणची वीज यंत्रणा ही सार्वजनिक ठिकाणी आहे. यात वीजवाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर आदी यंत्रणा उघड्यावर असल्याने फटाके फोडताना त्यापासून सुरक्षित अंतर ठेवावे. फटाक्यांच्या आतषबाजीत सार्वजनिक वीजयंत्रणेला आगीचा धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. रोहित्र, फ्यूज पेट्या, फिडर पिलर, रिंग मेन युनिट जवळ फटाके फोडू नयेत किंवा त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नये अथवा तो जाळू नये. वीज वाहिन्यांना स्पर्श होईल किंवा धोका निर्माण होईल असे रॉकेटसारखे फटाके वाहिन्यांखाली उडवू नयेत. मोकळ्या जागेतच फटाके उडवावेत. वीज यंत्रणेला आग लागल्यास, धोका निर्माण झाल्यास, वीज पुरवठा खंडित झाल्यास महावितरणच्या २४ तास सुरु असणाऱ्या कॉल सेंटरच्या १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ किंवा १९१२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

दिवाळी साजरी करताना घरगुती विद्युत उपकरणांपासून देखील सावध राहावे. घराच्या किंवा इमारतीच्या रोषणाईसाठी दिव्यांची विद्युत माळ चांगल्या दर्जाची असल्याची खात्री करून घ्यावी. विद्युत माळेचे वायर, दिवे, सॉकेट दर्जेदार नसल्यास धोका निर्माण होऊ शकतो. घर किंवा इमारतीचे अर्थिंग योग्य असल्याची तपासणी करावी. घराबाहेर आकाशकंदील लावताना तुटलेल्या वायरचा वापर टाळावा किंवा तुटलेली वायर चांगल्या दर्जाच्या इन्सुलेशन टेपने सुरक्षित करून घ्यावी. घरगुती उपकरणांसह विद्युत माळेपासून सुरक्षित अंतरावर तेलाच्या वातीचे दिवे लावावेत. विद्युत सॉकेटवर अधिकचा भर टाकू नये.

आकाश कंदिल किंवा दिव्यांच्या विद्युत माळेसाठी श्री पीनचा वापर न करता वायर्स थेट प्लगच्या छिद्रात आगपेटीच्या काड्यांच्या साह्याने खोचले जातात. त्यामुळे त्या प्लगमध्ये स्पार्किंग होऊन आग लागण्याची शक्यता असते. गॅलरीमधील लोखंडी जाळी किंवा घराचा लोखंडी जिना किंवा इतर कोणत्याही लोखंडी वस्तूपासून विद्युत दिव्यांची व आकाश कंदिलाची वायर दूर ठेवावी. ही वायर एकसंध असावी. तुटलेली किंवा सेलो टेपने जोडलेली नाही याची खात्री करून घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# आता शिक्षकांना घेता येणार २० विषयांचे ऑनलाइन धडे

## ब्लेन्डेड ऑनलाइन कोर्स : प्रत्येक विषयासाठी शिक्षकांना पाच तासांचा वेळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

राज्य सरकारच्या स्टार्स प्रकल्पांतर्गत प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षणासाठी एकूण २० विषयांसाठी 'ब्लेन्डेड ऑनलाइन कोर्स' सुरू करण्यात आला आहेत. राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांना त्या करिता नाव नोंदणी करता येणार आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतर्फे या कोर्सचे धडे दिले जाणार असून, प्रत्येक विषयासाठी शिक्षकांना पाच तासांचा वेळ लागणार आहे. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान आणि सामाजिक या विषयांचे ब्लेन्डेड कोर्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हा कोर्स मराठी माध्यमात उपलब्ध असणार आहे. इतर माध्यमांतील शिक्षकांनाही कोर्स करता येणार आहे. एका शिक्षकाला एकाच कोर्ससाठी नोंदणी करता येईल.

जिल्ह्यातील शिक्षकांनाही हा कोर्स ना करता येणार असून यासाठी शिक्षण वप्रशिक्षण गटशिणाधिकाऱ्यांच्या संस्थेतर्फे माध्यमातून शिक्षकांना - कळविले जात असल्याची माहिती आहे.

**सेवापुस्तकात होणार नोंद**

कोर्स पूर्ण करताना कोर्समधील सर्व व्हिडिओ पूर्णपणे पाहून विषयाचीमाहिती मिळवणे आवश्यक आहे. नवे व्हिडिओ पाहून झाल्यावरच मूल्यमा-पनासाठी प्रश्न उपलब्ध होणार आहेत. सर्व शिक्षकांनी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी हा कोर्स करणे आवश्यक आहे. त्यासाठी 'दीक्षा'वर नाव नोंदणी करून शिक्षकांना हा कोर्स पूर्ण करावा लागणार आहे. हा कोर्स पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना प्रमाणपत्र दिले जाणार असून, त्याची सेवापुस्तिकेत नोंदसुद्धा केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# दिवाळीत बाहेरगावी जाण्याची तयारी करताय? ही काळजी घ्या

## बंद घरांना चोरटे करतात लक्ष्य : रक्कम, मौल्यवान वस्तू घरात ठेवू नका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

दिवाळी अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपली आहे. लवकरच शाळांना सुट्यादेखील लागतील. दिवाळीच्या सुट्टयांमध्ये अनेकांकडून बाहेरगावी जाण्याचा बेत आखला जातो. मात्र, घराला कुलूप लावून अनेक दिवस बाहेरगावी राहिल्यास चोरांकडून पाळत ठेवून घरफोडी होण्याची शक्यता बळावते. त्यामुळे बाहेरगावी जाताना शेजाऱ्याला सांगावे, वस्तीत गुरखा नेमावा यासह इतर उपाययोजना करण्याचा सल्ला पोलिसांनी दिला आहे.



मूळ गावापासून नोकरी, व्यवसाय, मुलांच्या शिक्षणानिमित्त दूर शहरात वसलेल्या लोकांना दिवाळीच्या काळातच गावी जाण्याचा योग येतो. गावी जाण्यासाठी तिकीट बुकिंग, बॅगांची पॅकिंग, कपडे खरेदी अशी सर्व तयारी सुरू झाली आहे. मात्र, दिवाळीसाठी गावी किंवा फिरायला इतरत्र कुठे जात असाल आणि घराच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केल्यास या काळात चोरटे घरांमध्ये दिवाळी साजरी करतील, असे व्हायला नको. यासाठीदिवाळीच्या सुट्यांमध्ये मौजमजा म्हणून नक्की फिरायला जा; पण त्यासोबतच घरातील मौल्यवान वस्तू, पैशांची काळजी घेणेही आवश्यक आहे.

घराचे दरवाजे मजबूत असायला हवे. याशिवाय दर्जेदार कुलूप आणि सुरक्षेखातर आवश्यक यंत्रणा असायला हवी, असा सल्ला पोलिसांकडून दिला जात आहे.

**बंद घरावर ठेवली जाते पाळत**

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये फिरायला जाणाऱ्यांच्या घरांवर चोरट्यांकडून पाळत ठेवली जाते. अनेक दिवस घर बंद दिसल्यास त्याठिकाणी चोरीचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे नागरिकांनी बाहेरगावी जाताना योग्य ती खबरदारी घ्यावी.

**काय काळजी घ्याल?**

बाहेरगावी जाताना बंद घरात दागिने, पैसे मौल्यवान वस्तू घरी न ठेवू नये. त्या वस्तू सोबत न्याव्या अथवा बँक लॉकरमध्ये ठेवाव्या. गावी जात असताना शेजाऱ्यांना कल्पना देऊन जावे. ३ ते ४ घरांनी मिळून एखादा गोरखा नेमावा. रात्रीच्या गस्तीवरील पोलिस कर्मचारी यांचा संपर्क क्रमांक घ्यावा. कॉलनी किंवा परिसरात संशयि- तरीत्या एखादा व्यक्ती फिरत असल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी. उच्च प्रतीचे कुलूप दरवाजास लावावे. अलार्मसारखी एखादी बेल दरवाजास बसवावी. गावी जाताना घरातील, परिस-रातील लाइट सुरू ठेवावे.

**बंद घरावर ठेवली जाते पाळत**

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये फिरायला जाणाऱ्यांच्या घरांवर चोरट्यांकडून पाळत ठेवली जाते. अनेक दिवस घर बंद दिसल्यास त्याठिकाणी चोरीचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे नागरिकांनी बाहेरगावी जाताना योग्य ती खबरदारी घ्यावी.

# पर्यावरणपूरक आकाश कंदील ठरताहेत लक्षवेधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

दिवाळीची रोषणाई खऱ्या अथनि जाणवते ती झगमगणाऱ्या आकाश कंदिलांमुळे, दिवाळीसाठी शहरातील सर्व बाजारपेठा गजबजल्या आहेत. बाजारात खण आणि पैठणीच्या कापडापासून बनवलेल्या आकाश कंदिलांना ग्राहकांकडून विशेष पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील इतवारा, अंबादेवी, जयस्तंभ चौक, गाडगे नगर, जवाहर गेट परिसर मोची गल्ली यासह अन्य ठिकाणी बाजारपेठेत दिवाळी खरेदीसाठी नागरिकांची वर्दळ वाढली आहे. आकाश कंदिलांच्या स्टॉल्समुळे दिवाळीची चाहूल जाणवत आहे. दिवाळीची शोभा वाढवणारे वेगवेगळ्या आकारातील आणि आकर्षक रंगातील आकाश



कंदील विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आले आहेत. नागरिक दरवर्षी काही तरी हटके शोधत असतात. त्यामुळे आता नागरिकांना खण आणि पैठणीच्या कापडापासून तयार केलेले पारंपरिक आकाशकंदील भुरळ घालत आहेत. विविध रंगांतील पैठणीच्या व खणाच्या कापडापासून निर्मित चौकोनी, षटकोनी आकाश कंदील यंदा बाजारात आले. यातील टे डेकोरेशनसाठी लावण्यात येणारे आकाशकंदीलही उपलब्ध आहेत. यामध्ये फ्लोरोसंट हंडी, मेटॅलिक हंडी हे प्रकार उपलब्ध आहेत. रंगबिरंगी कापडी व कागदी कंदील, हॅलोजन कंदील, मार्बल पेपर कंदील, वेताचा वापर केलेले कंदील, फोल्डिंगचे कंदील, मेटल स्टार, लोटस, फायरबॉल, झगमगते आकाश कंदील पाहायला मिळत आहेत.

# कर्तव्यनिष्ठा-आशावाद आणि भविष्यवेधी विचारांची कास धरून आशीर्वाद पदयात्रेची अविरतपणे वाटचाल सुरू

## गगलानी नगर-गुरुकृपा कॉलोनी-व्यंकटेश कॉलोनी येथे आशिर्वाद यात्रेला नारीशक्ती व ज्येष्ठांच्या आशीर्वादाचे बळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

विकसनशील अमरावती शहराला विकसित बनविण्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवून उद्दिष्टानुकूल निर्णय आणि धोरणांची परंपरा कायम ठेवीत पायाभूत सुविधांचा गतीमानतेन विकास करण्यावर आपला सातत्यपूर्ण भर आहे.पायाभूत सुविधांचे ठोस नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी अमरावती शहराच्या वाढीसाठी आणि शाश्वत विकासासाठी आतापर्यंत मला लाभलेली जनसामान्यांची साथ सदैव प्रेरणादायी ठरली आहे.तोच जिव्हाळा व आपुलकी कायम राखीत आपण मला मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत,जेणेकरून शहरातील दळणवळण,प्रवासी वाहतूक आणि मालाची वाहतूक सुधारण्यासाठी पायाभूत सुविधांसह अत्यंत काटेकोर व प्रभावी नियोजनातून शहराचा आर्थिक विकास व परिवर्तन व याचा दीर्घकालीन लाभ जनतेला होण्यासाठी मला सातत्यपूर्ण प्रयत्नशील राहता येईल.यकरिताच आगामी २० नोव्हेंबर-२०२४ रोजी नागरिकांनी मला बहुसंख्येने मतदान करून नागरिकांच्या सेवेची संधी द्यावी.असे विनंतीपूर्ण आवाहन महायुतीच्या उमेदवार-सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी कठोरा रोड स्थित-स्वावलंबी नगर-कलोती नगर-विठाई नगर येथील मतदार बांधव व भगिनींना केले.प्रत्येक घराघरात... मनामनात... आशीर्वाद पदयात्रेला घेऊन उत्साही वातावरण निर्मिती झाल्याचे चित्र दिसून येत आहे.भेटीगाठीतून-थेट संवादातून आ.सौ.सुलभाताई खोडके



नागरिकांना मतदानाचा हक्क-अधिकार बजाविण्याचे आवाहन करीत आहे.मुलींना सक्षम व सबलीकरणाची गरज आजच्या काळात विशेष महत्वाची आहे. एकविसाव्या शतकात स्त्रियांना स्वतंत्रता व समान अधिकार मिळाला असला तरी अजूनही सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात मुलींना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.महिला सबलीकरणामध्ये आर्थिक आत्मनिर्भता हा महत्वाचा घटक आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या मुली स्वतःच्या आयुष्यात स्वनिर्णय घेऊ शकतात.अमरावती विधानसभा मतदारसंघात आशिर्वाद पदयात्रेच्या निमित्ताने आपण सांगू इच्छितो की ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी व युवक बांधव यांच्याशी सुसंवाद-भेटीगाठीतून तसेच जनसामान्यांच्या आशिर्वादातून सकारात्मक उर्जेचा स्रोत प्राप्त होतो.ही सकारात्मक ऊर्जा आपल्यासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरू पाहत आहे.या शब्दांत महायुतीच्या उमेदवार-सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी गगलानी नगर-गुरुकृपा कॉलोनी-व्यंकटेश कॉलोनी-मेहेरबाबा कॉलोनी येथील स्थानिकांशी संवाद साधला. कर्तव्यनिष्ठा,आशावाद आणि भविष्यवेधी विचारांची कास न सोडता अनेक आव्हाने,चढउतार आले तरी प्रयत्नवाद न सोडण्याची आपणाकडून लाभलेली ऊर्जा मला सेवाभावी उपक्रम तसेच सार्वजनिक, राजकीय,सामाजिक जीवनात यासोबतच आशिर्वाद पदयात्रेत वाटचाल करताना बहुपयोगी ठरत आहे.



# बच्चू कडू उद्या करणार नामांकन अर्ज दाखल

## हजारोच्या संख्येने प्रहार चे कार्यकर्ते नामांकन रॅलीसाठी सज्ज
## सलग पाचव्यांदा आमदार होणार बच्चू कडू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ अचलपूर**

अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या तसेच तिसरी आघाडी परिवर्तन महारॅलीचे उमेदवार आमदार बच्चू कडू यांचा नामांकन अर्ज उद्या दि. २८ ऑक्टोबर रोजी भरणार आहे. अचलपूर गांधी पुल,येथून सकाळी ११:३० वाजता ते उपविभागीय कार्यालय अचलपूर येथे भव्य पायदळ रॅली काढून बच्चू कडू प्रचंड शक्तिप्रदर्शनात नामांकन अर्ज दाखल करणार आहे. अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील हजारो कार्यकर्ते या महारॅलीसाठी सक्रिय झाले आहे.

प्रहार चे दमदार आमदार म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले बच्चू कडू यांनी अचलपूर विधानसभेचे सलग वीस वर्षापासून प्रतिनिधित्व केले आहे. सर्वसामान्यांचा,शेतकरी, शेतमजूर तसेच दिव्यांग, अनाथांचा नेता म्हणून ते लोकप्रिय आहे म्हणूनच जनतेने सलग त्यांना चार वेळा विधानसभेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली.या निवडणुकीत सुद्धा प्रहार चे कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी,शेतमजूर पूर्ण ताकतीने मैदानात उतरले आहे, आमदार म्हणून मतदारसंघात केलेली विकास कामे प्रत्येकाच्या घरोघरी पोहोचण्याकरता प्रहारचा प्रत्येक कार्यकर्ता रात्रीचा दिवस करीत आहे. या निवडणुकीत आमदार बच्चू कडू पाचव्यांदा विजय होऊन इतिहास रचणार यामध्ये तीळ मात्र ही शंका नाही असा विश्वास प्रहार कार्यकर्त्यांना आहे शिवाय मतदारांचा कल सुद्धा बच्चू कडू यांनी केलेल्या सार्वत्रिक विकास कामांकडे असल्याचे दिसत आहे.

दिव्यांग, रुग्ण, विधवा आणि शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नांवर काम करण्याच्या जोरावर २००४ च्या विधानसभा निवडणुकीत बच्चू कडू प्रचंड मतांनी विजयी झाले. परंतु आपली संघटना राजकारणासाठी नसून समाजकारणाची आहे असा आदेश त्यांनी प्रहारच्या कार्यकत्यांना दिला.त्या अनुषंगाने आजही प्रहार पक्ष ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण करते.

देशातल्या राजकारणात बच्चू कडू यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे त्यामुळे त्यांच्या राजकीय करकीर्दीकडे मोठ्या आशेने बघितल्या जाते हे विशेष!

### ६७०० कोटींच्या निधींची विकासकामे

अचलपूर मतदारसंघाच्या विकासासाठी तब्बल ६ हजार ७०० कोटी रुपयांचा विकास निधी आ. बच्चू कडू यांनी उपलब्ध केला.अनेक विकासात्मक कामे त्यांनी मतदार संघात केली असून यामुळे मतदार संघ सुजलाम सुफलाम झाला आहे. पुढील पन्नास वर्षाच्या सिंचनाचे नियोजन झालेले आहे, मतदारसंघात कोणत्याही शेतकरी आपल्या ओलिताच्या शेतीपासून पासून वंचित राहणार नाही, या काटेकोर नियोजनातून सिंचन व जलसंधारणाचे नियोजनबद्ध अनेक विकास कामे सुरू आहे, केलेल्या नियोजन मतदारसंघातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी सुद्धा बच्चू कडू यांच्या प्रयत्नाने प्राप्त झाला असून यामुळे देवस्थानांचा कायापालट व सौंदर्यकरणाचे कामे टप्प्या टप्प्याने सुरू आहे. जनतेच्या घरकुलांचे प्रश्न, रोजगार आणि सर्व सामान्यांना भेडसावणारे प्रश्न यांची सोडवणूक करण्याचे प्रामाणिक प्रयत्न बच्चू कडू यांनी केले. लोकांच्या समस्यांचे निराकारण गावातच करता यावे, यासाठी 'राहुटी' हा उपक्रम राबवला, तो कमालीचा यशस्वी ठरला. यापुढेही अशाच आक्रमकतेने जनसेवा करण्याचा संकल्प बच्चू कडू यांनी केला आहे.

## देवपारे म्हणतात? मी आता दोन मतदार संघातून निवडणूक लढणार : तिकीट न मिळाल्याने संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

दर्यापूर मतदार संघातून काँग्रेस ची उमेदवारी मिळणार या आशेवर गुणवंत देवपारे यांनी दर्यापूर मतदार संघात जोरदार प्रकाहर यात्रा काढायला सुरुवात केली मात्र ऐन वेळेवर तिकीट न मिळाल्यामुळे गुणवंत देवपारे हे चांगलेच संतापले असून आपल्या तिकीट कापण्यामागे जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांचा सिंहाचा वाटा असल्याचा थेट आरोप त्यांनी आज पत्रकार परिषदेतून केला त्यामुळे आता आपण काँग्रेस ला सोडचिठ्ठी देणार असून एक नव्हे तर दोन मतदार संघातून निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले दर्यापूर मतदार संघातून आपण उमदेवार अर्ज दाखल करणार आहोत तर दुसऱ्या मतदार संघाचे नाव लवकरच जाहीर करू असेही ते यावेळी म्हणाले.गुणवंत देवपारे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे काँग्रेस गटात चांगलीच खळबळ माजली असून दुसरा मतदार संघ कोणता या कडे सर्वांच लक्ष लागले आहे.

# बडनेरा मतदारसंघात प्रीतीताई करणार 'बंड'

## उद्याला दाखल करणार उमेदवारी अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ अमरावती**

शिवसेनेचे दिवंगत नेते माजी आमदार संजय बंड यांच्या सहचारिणी प्रीतीताई बंड यांना शिवसेनेने (उबाठा) विधानसभेच्या बडनेरा मतदारसंघातून उमेदवारी नाकारल्याने त्या नाराज झाल्या असून शिवसैनिकांच्या आग्रहानंतर त्यांनी सोमवारी (ता. २८) अपक्ष उमेदवारी दाखल करणार आहे.

शिवसेनेने (उबाठा) बुधवारी बडनेराच्या (ता.२३) जागेसाठी पक्षाचे जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचं नाव जाहीर केलं. त्यामुळं प्रीती बंड यांच्यासह त्यांच्या समर्थकांना मोठा धक्का बसला. मला अगोदर कामाला लागा असं सांगितले . यामुळं मी गत अनेक दिवसांपासून पदयात्रा आणि मतदारांच्या भेटी सुरू केल्या होत्या. मात्र, आता ऐनवेळी पक्षश्रेष्ठींनी जो काही निर्णय घेतलाय, त्यानंतर कोणाशी काय बोलावं हे सुचतच नाही, असे त्या कार्यकर्त्यांना म्हणाल्या होत्या. कार्यकर्त्यांसोबत विचार विनिमय करून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले होते. आता त्यांनी बडनेरा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या सोमवारी उमेदवारी दाखल करतील, अशी माहिती दिली.







